# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद वाशिम

वाचा:- १) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ (नियम ४ खालील) १९९ चे परिशिष्ट २ नुसार केलेल्या सुधारणेनुसार.

२) पा.पु व स्व विभागाचे शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१००५/प्र.क्र.८५/पापु-०७ मंत्रालय मुंबई दि.०९/०५/२००५ अन्वये तांत्रीक मंजुरीचे अधिकार.

३) शासन निर्णय क्र.ग्रापाधो ११०९/प्र.क्र१०४(अ)/पापु-०७ दि.१७/०३/२०१०.

४) शासन निर्णय क्र.ग्रापाधो१२१३/प्र.क्र.३५/पापु-०७ दि.१६/०७/२०१३.

५) शासन निर्णय क्र.ग्रापाधो१११४/प्र.क्र.२२/पापु-०७ दि.०९/०७/२०१४.

६) शासन निर्णय क्र.ग्रापाधो१११४/प्र.क्र.५२/पापु-०७ दि.१७/१०/२०१४.

७) शासन निर्णय क्र.ग्रापाधो१११४/प्र.क्र.६१/पापु-०७ दि.१५/०६/२०१५.

८) शासन निर्णय क्र.ग्रापाधो१११५/प्र.क्र.९२/पापु-०७ दि.०७/०५/२०१६. (MRDWP).

९) प्रशासकिय मंजुरी आदेश क्र.१०२१ दि.१५/०६/२०१७

---

जा.क्र/जिपवा/ग्रापापुवि/निविदा/ ९७ /२०१८
दि. 11/05/18

कार्यारंभ आदेश
करारनामा क्र.बी.१/08 /२०१८-१९

प्रति,

श्री दिलीप सत्यनारायण गट्टाणी,कंत्राटदार
रा.मालेगाव ता.मालेगाव जि वाशिम,

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमातर्गत मौ कु-हा ता रिसोड येथील स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना करणे या कामाच्या निविदेबाबत आपल्याकडुन प्राप्त झालेला देकार हा अंदाजपत्रकीय दर रक्कम रु ७४२२१२३/- (अक्षरी रु चौ-यात्तर लाख बावीस हजार एकशे तेवीस रु फक्त) कामासाठी (-३.५१%) कमी दराने रु.६६३५७१३/- (अक्षरी सहासष्ट लाख पंस्तीस हजार सातशे तेरा रु. फक्त) दराने सादर केलेली आहे. तसेच आपण रक्कम रु ६५००/- च्या मुद्रांकावर करारनामा करुन देण्यात यावा.

तसेच उपांग १ ची कामे पुर्ण झाल्यावर स्त्रोत योग्य व पुरेसा असल्याचे सक्षम प्राधिका-याकडुन प्रमाणित करुन घ्यावे,त्यानुसार मौ.कु-हा ता रिसोड स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना जि वाशिम या योजनेतील प्रथम टप्याचे काम (उपांग क्र.१ :- स्त्रोताचा विकास करणे) मंजुर ब-१ ई-निविदेप्रमाणे सुरु करावे.सदर कामाची देखरेख करण्याबाबत,उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग वाशिम यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.प्रथम टप्याचे काम पुर्ण झाल्यानंतरच ,उपांग-२ आणि उपांग-२ ची कामे पुर्ण झाल्यानंतरच उपांग-३ चे काम करण्यात यावे.सदर योजनेचे काम सुरु असतांना,कामावर उपस्थित राहणा-या जबाबदार व्यक्तीचे नाव व संपुर्ण पत्ता या कार्यालयास कळविण्यात यावा.या कामाबाबतचा सर्व पत्रव्यवहार,उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिप उपविभाग वाशिम यांच्यमार्फतच करण्यात यावा.करारनाम्याप्रमाणे शासकीय संचालनाकडे कामागारांचा व कामाचा विमा उतरविणे अनिवार्य आहे. सदर कामाचा सदोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्यानंतर ३६ महीने राहील.

| अ.क्र | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता क्र. व दिनांक | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | निविदा किंमत | कंत्राटदराने दिलेले दर | स्वीक्रत निविदेची किंमत | प्रथम टप्याच्या कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत मौजे कु-हा ता.रिसोड येथील स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना | शासन निर्णय क्रमांक मुपेयो-२०१७ /प्रक्र.६१/पापु-१९ दि.२५/०४/२०१७ | ३१५ दि ०७/११/२०१६ | ६८७७०९९/- | -३.५१ कमी दराने | ६६३५७१३/- | दि.३१/०९/२०१८ पर्यंत |

Scanned by CamScanner

P.No. (2)

**लेखाशिर्षे :- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम.**

**अटि व शर्ती :-**

१) शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७ दि.०९/१०/२०१३ नुसार स्त्रोताचा शाश्वतेबाबत भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे योग्यता प्रमाणपत्र घेण्यात यावे व स्त्रोताचे पाणी पिण्यास योग्य असलेबाबत दाखला जिल्हा प्रयोगशाळेकडुन प्राप्त करुन घेणे मक्तेदारास बंधनकाराक राहील.

२) शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी २०१७ मधील सुचनांनुसार उपांग-१ चे काम पुर्ण झाल्यानंतर व योजनेचा उद्भव पुरेसा/शाश्वत असल्याने सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केल्यानंतरच उपांग-२ चे काम हाती घेण्यात यावे आणि उपांग-२ काम पुर्ण झाल्यानंतरचा उपांग-३ चे काम हाती घेण्यात यावे. उपांग-२ व ३ साठी स्वतंत्र आदेश देण्यात येतील.

३) ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेतील सर्व अटि व शर्ती मक्तेदारास बंधनकारक राहतील.

४) योजनेच्या कामावर पुरेसा अनुभव प्राप्त तांत्रिक प्रतिनिधी नेमणे आवश्यक राहील.

५) योजनेच्या कामावर बालकामगाराची नेमणुक करता येणार नाही.

६) शासनाने वेळोवेळी निर्देशीत केल्याप्रमाणे व्हॅट,जीएटी (GST) व अन्य आवश्यक कर प्रत्येक देयकातुन कपात करण्यात येतील.तसेच निविदा हया (GST) चा विचार करुन मागविण्यात आलेल्या असल्याने, GST कपातीस कंत्राटदार सर्वस्वी जबाबदार राहील व आवश्यक GST अथवा अन्य कर देयकातुन कपात करण्यास कंत्राटदारास बंधनकारक राहील.

७) दिनांक ०७ मे २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजना पुर्ण झाल्यानंतर किमान तीन वर्षे (Trial Run कालावधी वगळुन)योजना चालविणे कंत्राटदारावर बंधनकारक करण्यातआले आहे.योजना पुर्ण झाल्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीदरम्यान आस्थापना,विद्युत देयके,रसायणे व इतर अनुषंगिक बाबींवरील खर्च ग्रामस्थाकडुन ग्रामपंचातीने वसुल करण्यात आलेल्या पाणीपट्टीमधुन भागविण्यात यावा.

८) सदर योजना रितसर संबंधीत ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करावी.

९) काम चालु करणेपुर्वी कंत्राटदाराने संपुर्ण कामाची विमा पॉलीसी सक्षम अधिका-याकडुन काढुन ती मंजुर शर्तीनुसार कार्यालयास सादर करावी.मंजुर निविदेतील खंड-४८ नुसार तुमचा देकार हा संपुर्ण करारासह आहे.त्यात व्हॅट व सेवाकर समाविष्ट आहे.याशिवाय ठेकेदारास कामगार कल्याण निधी व तत्सम रक्कम अदा करावी लागेल.

१०) कामाची मुदत या पत्राच्या दिनांकापासुन परिगबित करण्यात येईल व कोणत्याही परिस्थीतीतही कामास मुदतवाढ देण्यात येणार नाही.

११) योजनेचे काम सुरु असतांना केलेल्या कामाचे प्रत्यक्ष चित्रीकरण करुन देयक सादर करतांना चित्रीकरणाची व्ही.डी.ओ सी .डी देयकासोबत सादर करावी.

१२) योजना कार्यान्वित झाल्यानंतर प्रत्येक घरात खाजगी नळ जोडणी देणे बंधनकारक करावे,जेणेकरुन पाणीपटटी वसुली जास्त प्रमाणात होऊन योजना स्वयंसंतुलित होईल.

१३) योजनेसाठी कुठल्याही प्रकारचा मोबिलायझेशन ॲडव्हास व एस्केलेशन (भाववाढ) देय राहणार नाही.

१४) सदर योजनेचे देयक सादर करतांना मोजमाप पुस्तिका सहीत उपांगनिहाय फोटो व आवश्यक चाचणी अहवाल उप अभियंता यांचे स्वाक्षरीने सादर करावे.

१५) शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४ /प्र.क्र६१ /पापु-०७ दि १५/०६/२०१५ व शासन निर्णय क्र.मुपेयो-२०१७/प्र.क्र ७३/पापु-१९ दि १८/०५/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार योजनेचे त्रयस्थ तांत्रीक परिक्षण करणे अनिवार्य राहील न केल्यास आपणास कोणत्याही प्रकारचे देयक अदा केल्या जाणार नाही.

१६) वहीरीचे काम सुरु करण्यापुर्वी ,ट्रायलबोअर घेऊन आवश्यक ते पिण्यायोग्य पाणी लागल्यानंतरच विहीरीचे खोदकाम करण्यात यावे.

१७) योजनेची कामे प्रवाहाच्या दिशेनेच करण्यात यावीत.

१८) उद्भव विहीरीचे काम पुर्ण झाल्यानंतर पाण्याचे नमुने घेउन जिल्हा प्रयोगशाळेत भौतिक,रासायणिक व जैविक चाचण्या करुन पाणी पिण्यास योग्य आहे किंवा नाही,याची खात्री करण्यात यावी.तसेच उद्भवाची पाणी आवक चाचणी पावसाळ्यापुर्वी घेऊन संकल्पित लोकसंख्येस आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असल्याचे सक्षम अधिका-याने प्रमाणित केल्यानंतरच योजनेची पुढील कामे हाती घेण्यात यावीत.

१९) योजनेच्या कामाच्या ठिकाणी फलक लावणे बंधनकारक राहील.फलकावर योजनेविषयी सविस्तर माहीती देणे बंधनकारक राहील.

२०) योजनेची कामे हाती घेण्यापुर्वी,उपांगांसाठी आवश्यक जागा उपलब्ध करुन ताब्यात घेण्याची जबाबदारी ग्रामपंचायत /ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती व संबंधीत उपअभियंता यांची राहील.

२१) सदर योजनेस इतर कार्यक्रमांतर्गत यापुर्वी मजुरी देण्यात आलेली नाही,असे गृहीत धरुन तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे.तसचे यापुर्वी इतर कार्यक्रमातुन मंजुरी दिली असल्यास ती रद्द समजण्यात यावी.

Scanned by CamScanner

२२) सदर योजनेची अंमलबजावणी ही शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल.तसेच योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधीत ग्रामपंचायत यांची राहील.योजना चालविणे त्याचे परिक्षण व देखभाल दुरुस्ती यासाठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधीत ग्रामपंचायतीस जि.प कडुन/शासनाकडुन कोणतीही मंदत अथवा अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

२३) योजनेची कामे पुर्ण झाल्यानंतर,सदर योजना ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.त्यासाठी कुठलाही निधी कंत्राटदारास देय राहणार नाही.

२४) संबंधीत कंत्राटदाराने त्याचे खर्चाने योजनेतील आर.सी.सी कामासाठी उदा.उद्‌भव विहीर,उंच/बैठा जलकुंभ,जलशुध्दीकरण केंद्र ,हेडवर्क्स आर.सी.सी जोडपुल इत्यादी कामांसाठी शासन मान्यता प्राप्त संस्थेमार्फत /शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय यांचेमार्फत आर.सी.सी संकल्पन करण्यात यावे व त्यास सक्षम अधिका-याची मान्यता घेण्यात येऊन काम हाती घेण्यात यावे.

२५) योजनेची कामे सुरु करण्यापुर्वी कंत्राटदाराने त्याचे खर्चाने लागणारे साहीत्य उदा.सिमेंट वाळु,खडी,लोखंड,सळई इत्यादी शासकीय मान्यताप्राप्त तंत्रनिकेतन /शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय मधुन तपासणी करुन घ्यावे.याबाबत संपुर्ण जबाबदारी ही संबंधीत उपअभियंता यांची राहील.

२६) योजनेच्या खर्चात वाढ झाल्यास वाढीव खर्चापोटी शासकीय अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

२७) योजनेची कामे हाती घेण्यापुर्वी पाणी आरक्षण/पाणी उचल परवानगी/ना हरकत प्रमाणपत्र जलसंपदा विभागाकडुन प्राप्त करुन घ्यावे.त्याशिवाय योजनेची कामे कुठल्याही परिस्थितीत हाती घेण्यात येऊ नयेत.

२८) योजनेतील अस्तित्वातील उपांगे चांगल्या स्थितीत असल्यास त्याचा पुर्ण क्षमतेने वापर होईल असे बघावे.

२९) योजनेची कामे सुरु करण्यापुर्वी संबंधीत कंत्राटदार व उपअभियता यांनी कामे सुरु असतांना व कामे पुर्ण झाल्यावर आवश्यक ते सर्व फोटोग्राफस घेण्यात यावेत व ते देयकासोबत सादर करण्यात यावेत.तसेच संग्रही जतन करण्यात यावेत.

३०) शासनामार्फत वेळोवळी निर्गमित करण्यात येणारे शासन निर्णय/परिपत्रके/मार्गदर्शक सुचना/अध्यादेश इत्यादींचे पालन करणे बंधनकारक राहील.

३१) निधी उपलब्धतेनुसार जिल्हा परिषद कोणतीही बांधीलकी स्विकारणार नाही.शासनाकडुन आवश्यक निधी उपलब्धतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

३२) शासन निर्णय दि.२२/०१/२०१४ नुसार सदर गाव हागणदारीमुक्त करणे आवश्यक राहील.

३३) योजनेच्या तांत्रीक मान्यता व प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील तसेच ई-निविदा सुचनेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

३४) योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर संबंधीत उप अभियंता यांनी योजना काम पुर्णत्याचा दाखला सक्षम प्राधिका-यास सादर करणे बंधन कारक राहील.

३५) योजना पुर्ण झाल्यानंतर १००% घरगुती नळ जोडणी करण्याची जबाबदारी आपली राहील.

३६) योजनेचे काम सुरु करण्यापुर्वी भुसंपादन व इतर सर्व परवानग्या (जलसंपदा विभागाचे पाणी आरक्षण परवाना/वने/रेल्वे/रस्ते क्रासिंग/उद्‌भव जागा/पाण्याची टाकीची जागा इत्यादी ) प्राप्त झाल्याची खात्री केल्यानंतरच काम सुरु करण्यात यावे.

३७)सदर योजनेसाठी जागा निर्विवाद व उपलब्ध असल्याची खात्री करुनच कामास सुरुवात करावी.

३८) योजनेबाबत काही समस्या उद्‌भवल्यास अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे राहतील.

वरील सर्व अटि व शर्ती तसेच योजनेशी निगडीत सर्व प्रचलीत शासन निर्णय कंत्राटदारास व संबंधीतास बंधनकारक राहतील व त्यास अधिन राहुनच देयके पारित करण्यात येतील.

सहपत्र :- परिशिष्ट ब

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद वाशिम

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

Scanned by CamScanner

P.no (4)

**प्रत :-**

१) मा.मुख्य अभियंता ,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती विभाग,अमरावती यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२) मा.कक्ष अधिकारी ,पापु-१९ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्नालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग ,मंत्रालय मुंबई-४०० ००१. यांना माहीतीस्तव सविनय सादर.

३) मा.अधिक्षक अभियता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ अकोला यांना माहीतीस्तव सविनय सादर.

४) मा.अधिक्षक अभियता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक)नवीन प्रशासकिय इतारत, पहीला मजला, कन्हैया नगर, कोपरी ठाणे (पुर्व) ४०० ६०३. यांना माहीतीस्तव सविनय सादर.

५) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम हयांना माहितीस समादराने अग्रेषित.

६) उप मुख्य कार्यकारी (पाणी व स्वच्छता ) जिल्हा परिषद वाशिम यांना माहीतीकरीता सादर.

७) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,वाशिम यांना माहीतीस्तव समादराने अग्रेषित.

८) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक) डॉ हेडगेवार रुग्नालयाच्या पाठीमागे,गोरखेडा परिसर,औरंगाबात यांना माहीतीस्तव समादराने अग्रेषित.

९) उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जिल्हा परिषद रिसोड यांना माहिती स व उचित कार्यवाहीस रवाना. त्यांनी वर दर्शविलेले काम संबंधीत कंत्राटदाराकडून विहित मुदतीत पुर्ण करुन घ्यावे. विहित कालावधीत पुर्ण न झाल्यास अथवा विलंब झाल्यास अथवा या कामावर विहित खर्च न झाल्यास आपणास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल. काम सुरु झाल्यावर मासिक प्रगती अहवाल न चुकता सादर करण्याची दक्षता बाळगावी.

१०) गट विकास अधिकारी पंचायत समिती रिसोड यांना माहीतीकरीता रवाना.

११) शाखा अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जिल्हा परिषद रिसोड यांना माहिती करीता व योग्य कार्यवाहीता रवाना.

१२) विमा संचालनालय शासकीय विमा निधी महाराष्ट्र राज्य मुंबई हयांना माहिती करीता समादराने अग्रेषित.

१३) स.ले.अ/तांत्रीक शाखा/निण्दिा लिपीक यांना माहिती करीता रवाना.

१४) सरपंच/सचिव ग्रा.प कु-हा ता रिसोड. जि वाशिम यांना माहीतीकरीता रवाना.

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद वाशिम

11/05

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

Scanned by CamScanner